महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१७ वे | दिनांक : १८/११/२०२६ | वार : बुधवार

फोटो म्हणजे पाठिंबा नाही, राजकारण करू नका : एकनाथ शिंदेंचा रोहित पवारांना टोला



मुंबई : एखाद्या व्यक्तीसोबत फोटो असणे किंवा त्याच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणे म्हणजे त्या व्यक्तीला पाठिंबा देणे असा अर्थ होत नाही. केवळ फोटोच्या आधारावर कोणावरही आरोप करणे योग्य नाही, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर निशाणा साधला. सध्या राज्यातील शेतकरी संकटात असून दुष्काळाच्या परिस्थितीला सामोरे जात आहेत. अशा वेळी राजकारण करण्यापेक्षा शेतकऱ्यांना मदत करण्याला प्राधान्य दिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

रोहित पवार यांनी काही व्यक्तींसोबत असलेल्या छायाचित्रांवरून केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी ही प्रतिक्रिया दिली. एखाद्यासोबत फोटो असणे, एखाद्याच्या लग्नाला किंवा कार्यक्रमाला जाणे म्हणजे त्या व्यक्तीला पाठिंबा देणे किंवा तिची पाठराखण करणे असा निष्कर्ष काढता येत नाही. आरोप करणाऱ्यांचेही अनेक व्यक्तींसोबत फोटो असतात. त्यामुळे केवळ छायाचित्रांच्या आधारे आरोप करणे चुकीचे आहे. कोणताही ठोस पुरावा नसताना अशा प्रकारचे आरोप करू नयेत, असे शिंदे म्हणाले.

राज्यातील शेतकरी सध्या अडचणीत आहेत. दुष्काळामुळे त्यांच्यासमोर अनेक संकटे उभी राहिली आहेत. अशा परिस्थितीत राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. त्यांना एक बिस्किटचा पुडा तरी द्या, अशा शब्दांत शिंदे यांनी विरोधकांना सुनावले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करण्याची ही वेळ नाही. सर्वांनी मिळून संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर केलेल्या टीकेचाही एकनाथ शिंदे यांनी समाचार घेतला. २०१९ मध्ये शिवसेना आणि भाजप युती झाली होती. त्यावेळी राज्यात युतीचे सरकार स्थापन होणे अपेक्षित होते. मात्र, केवळ मुख्यमंत्रीपद आणि सत्तेसाठी उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रातील जनतेशी खोटे बोलून युती तोडली, असा आरोप शिंदे यांनी केला.

ज्यांनी २०१९ मध्ये राज्यातील जनतेचा विश्वासघात केला, त्यांनी अमित शाह यांच्यावर टीका करण्याचा नैतिक अधिकार नाही, असे म्हणत शिंदे यांनी ठाकरेंना लक्ष्य केले. उद्धव ठाकरे हेच खरे 'नंबर एकचे थापाडे' असल्याची टीकाही त्यांनी केली. मोदी आणि अमित शाह यांच्यावर टीका केली की माध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळते, त्यामुळे खोटे आरोप करून चर्चेत राहण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप शिंदे यांनी केला.

विरोधकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्याशिवाय दुसरे काही दिसत नाही. त्यांना मोदी फोबिया झाला असून प्रत्येक विषयात मोदी आणि शाह यांच्यावर टीका करण्याची सवय झाली आहे. माध्यमांमध्ये चर्चेत राहण्यासाठी आरोप केले जात असल्याचेही शिंदे म्हणाले.

एकीकडे शेतकरी दुष्काळाच्या संकटाचा सामना करत असताना दुसरीकडे राजकीय नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. अशा वेळी विरोधकांनी राजकारण बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा. राज्यातील जनतेला कोण खरे बोलत आहे आणि कोण खोटे बोलत आहे, हे चांगलेच समजले आहे, असा दावाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

ठाणे पोलीस आयुक्तांचा मोबाईल हॅक : स्टेटसवर १२ हून अधिक अश्लील व्हिडीओ अपलोड



ठाणे : सायबर गुन्हेगारांनी आता थेट पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच लक्ष्य केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे मोबाईलमधील व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, अकाऊंटचा ताबा मिळवल्यानंतर हॅकरने त्यांच्या व्हॉट्सॲप स्टेटसवर तब्बल १२ हून अधिक अश्लील व्हिडीओ अपलोड केले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या नावाने अशा प्रकारचा गैरवापर झाल्याने ठाणे पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या अकाऊंटचा वापर करून अश्लील स्वरूपाचे व्हिडीओ व्हॉट्सॲप स्टेटसवर ठेवण्यात आले. त्यांच्या संपर्क यादीतील अनेकांना हे स्टेटस दिसण्याची शक्यता असल्याने या घटनेची गंभीर दखल घेतली जात आहे.

पोलीस आयुक्तांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मोबाईलचे किंवा व्हॉट्सॲप अकाऊंटचे हॅकिंग झाल्याने सायबर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. सामान्य नागरिकांपासून ते वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांपर्यंत कोणाचेही डिजिटल अकाऊंट सायबर गुन्हेगारांच्या निशाण्यावर येऊ शकते, हे या घटनेतून समोर आले आहे.

या घटनेनंतर संबंधित अकाऊंट हॅक करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हॅकरने नेमक्या कोणत्या पद्धतीने अकाऊंटचा ताबा मिळवला, त्यामागे कोणाचा हात आहे आणि या प्रकारामागे केवळ खोडसाळपणा होता की अन्य काही उद्देश होता, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, थेट पोलीस आयुक्तांचेच व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक झाल्याने पोलीस दलात या घटनेची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणामुळे पोलीस यंत्रणेच्या सायबर सुरक्षेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत.

सायबर गुन्हेगारांकडून व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक करून त्याचा गैरवापर करण्याच्या घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अनेकदा अशा अकाऊंटच्या माध्यमातून संपर्कातील व्यक्तींना फसवणुकीचे मेसेज पाठवणे, आर्थिक मदत मागणे किंवा आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणे असे प्रकार घडतात.

मात्र, आता ठाण्याच्या पोलीस आयुक्तांचेच अकाऊंट हॅक झाल्याचा प्रकार समोर आल्याने सामान्य नागरिकांच्या डिजिटल सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर हॅकिंगमागील नेमके कारण आणि आरोपीची माहिती स्पष्ट होणार आहे.

१३ वर्षांनंतर नागपुरात रंगणार 'महाराष्ट्र केसरी'चा थरार! २० ते २४ जानेवारी दरम्यान कुस्तीचा महासंग्राम



नागपूर : महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली कुस्तीची परंपरा आणि मल्लांच्या ताकदीचा थरार पुन्हा एकदा नागपूरकरांना अनुभवता येणार आहे. तब्बल १३ वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे यजमानपद नागपूर शहराला मिळाले असून, येत्या २० ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत हा कुस्तीचा महासंग्राम रंगणार आहे. राज्यभरातील कुस्तीप्रेमींचे लक्ष आता या स्पर्धेकडे लागले आहे.

नागपूर महानगरपालिका आणि नागपूर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लकडगंज परिसरातील सरदार वल्लभभाई पटेल मैदानावर महाराष्ट्र केसरीचा हा आखाडा सजणार आहे. १३ वर्षांनंतर नागपुरात ही स्पर्धा होत असल्याने स्थानिक कुस्तीप्रेमी आणि खेळाडूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या स्पर्धेत राज्यातील ४२ शहरे आणि विविध तालमींचे संघ सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेत साधारण १३०० मल्ल आपले कुस्ती कौशल्य पणाला लावून प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देणार आहेत. त्यामुळे विविध वजनगटांतील चुरशीच्या लढती पाहण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणारे मल्ल आपल्या ताकदीच्या जोरावर महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावण्यासाठी मैदानात उतरतील. त्यामुळे यंदाच्या स्पर्धेत कोणता मल्ल प्रतिस्पर्ध्यांना चितपट करून 'महाराष्ट्र केसरी'चा मान मिळवतो, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

स्पर्धेच्या आयोजनासाठी मैदानावर विशेष व्यवस्था करण्यात येणार असून, यामध्ये दोन मॅटचे आखाडे आणि दोन मातीचे आखाडे तयार केले जाणार आहेत. त्यामुळे आधुनिक कुस्तीच्या मॅटवरील डावपेचांसोबतच पारंपरिक मातीतील कुस्तीचाही थरार प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्पर्धेचे काटेकोर नियोजनही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र केसरी हा राज्यातील कुस्तीपटूंसाठी अत्यंत प्रतिष्ठेचा किताब मानला जातो. या स्पर्धेत सहभागी होणे आणि विजेतेपद मिळवणे हे प्रत्येक मल्लाचे स्वप्न असते. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ वर्षांनंतर नागपूरला या स्पर्धेचे यजमानपद मिळणे ही कुस्तीप्रेमींसाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. जानेवारीत होणाऱ्या या महासंग्रामामुळे नागपुरात कुस्तीचा मोठा उत्सव रंगणार असून राज्यातील मल्लांना आपले कौशल्य दाखवण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

'ज्ञानरत्न पुरस्कार २०२६' ने गझलकार गिरीश जोशी सन्मानित होणार



आपेगाव : संत ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान, श्रीक्षेत्र आपेगाव यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित 'ज्ञानरत्न २०२६' पुरस्कारासाठी संभाजीनगरचे प्रसिद्ध गझलकार गिरीश जोशी यांची निवड करण्यात आली आहे. संस्थानतर्फे दरवर्षी आयोजित केले जाणारे 'संत ज्ञानोबाराय साहित्य संमेलन' येत्या २४ नोव्हेंबर २०२६ रोजी श्रीक्षेत्र आपेगाव येथे होणार आहे.गिरीश जोशी यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.साहित्य चळवळीत भरीव योगदान देणाऱ्या गिरीश जोशी यांच्या निवडीबद्दल साहित्य वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बावीस वर्षांनंतर वर्गमित्रांनी एकत्र येत आठवणींना दिला उजाळा



कन्नड (अरुण थोरात) : कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय कन्नड च्या सन २००४ च्या इयत्ता दहावीच्या वर्ग मित्रांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन दि. १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. तब्बल २२ वर्षानंतर वर्गमित्र एकत्र आल्यामुळे शाळेच्या अनंत आठवणींना उजाळा यावेळी मिळाला. या स्नेह मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक बाळासाहेब निकम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब निकम, मारुती तायडे, देवेंद्रसिंग राजपूत, मधुकर भालकर, आबासाहेब चव्हाण, संजय शिरसाट गणेश डव्हारे, जगन्नाथ जाधव व सचिव सागर जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगताद्वारे शालेय जीवनातील अनमोल आठवणींना उजाळा दिला. या बॅचचे अनेक विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत असून ते केवळ या शाळेतील शिक्षकांच्या अनमोल मार्गदर्शनामुळेच असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला एक सुंदर समई भेट देण्यात आली, कार्यक्रमाचे प्रास्ताविक पल्लवी जंगले सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे तर आभार सचिव सागर जाधव सर यांनी मानले.स्नेह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विशाल गोरखा, क्रांतिका कोलते, नानासाहेब उसरे, संजय जाधव यांनी अनमोल परिश्रम घेतले.

यावेळी दिपक शिंदे, सुमेध जाधव गोकुळ थेटे, राकेश थेटे, सुनील गोरे, संभाजी दिघोळे, ज्ञानेश्वर हिवाळे, मंगेश राठोड, मंगला पवार, राजश्री निकम, मनिषा काळे, वर्षा पाटील, सचिन गावंडे, गोकुळ थेटे, पवन राजपूत, अजय बोरसे, मनोज राठोड, अंकुश जाधव, योगेश पवार, युवराज नागरे, रवींद्र दळवी, सोमनाथ काकडे, रामेश्वर बोर्डे, जमील तडवी, दयानंद राऊत, प्रशांत दिश्वरे, अरुण बोडखे, भगवान नागरे, रघुनाथ सोनवणे, मुजीब शेख, रवींद्र राठोड या माजी विद्यार्थ्यांची स्नेह मेळाव्यास उपस्थिती होती.

कन्नड घाट चालू करण्यासाठी साखळी उपोषणाचा इशारा



कन्नड (अरुण थोरात): कन्नड चाळीसगाव घाटातील जड वाहनास उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशाने वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला आहे. कन्नड तालुका मोटर चालक-मालक संघटनेच्या वतीने दि. १७ नोव्हेंबर रोजी कन्नड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले, निवेदनात नमूद करण्यात आले की, फायनान्स कंपनीकडून आम्ही गाड्या लोन वर घेतलेले आहेत. दोन वर्षापासून घाट बंद असल्यामुळे आमची उपासमारीची वेळ आलेली आहे. कन्नड तालुक्यातील गाडी लाईन मधील व्यवसायिक सर्व डबघाई आलेले आहेत. आपला उदरनिर्वाह कसा करायचा असा प्रसंग आता या लोकांना पडू लागला आहे.कन्नड शहरातील तसेच सोलापूर- धुळे राष्ट्रीय महामार्ग- ५२ वरील घाट बंदीचा परिणाम पेट्रोल पंप, हॉटेल व्यवसायिक, स्पेअर पार्ट, गॅरेज वाले व टायर वाले हे अडचणीत आले आहेत. काही गाडीमालकांनी आपल्या गाड्या विक्री काढल्याचेही यावेळेस बोलण्यात आले. याचा विचार करुण दि.०१डिसेंबर पर्यंत शासनाने आमचा विचार न केल्यास आम्हाला नाईलाजाने गाड्या सहित दि.०२ डिसेंबर पासून चाळीसगावघाट, भांबरवाडी नाका येथे चालक-मालक संघटनेचे वतीने साखळी उपोषण करण्याचा इशारा देत आहोत.

या निवेदनावर मुख्य सल्लागार डॉ. सदाशिव पाटील, अध्यक्ष शेख इमरान, याकूब भाई, विजय जाधव, गणेश वेताळ, सुरेश बच्छाव यांच्या स्वाक्षरी आहे. याप्रसंगी फिरोज खान पठाण, बंडू मोरे, नवैद शेख, असलम शेख, अजीम शेख, अजहर शेख, तनवीर सय्यद, कादर रहमान, इस्माईल जमादार, शोएब खान, नवीद शेख, इमरान शेख, शेख अतीक, नंदू पांडे, रिजवान शेख, अल्ताफ खान, बाबा शेख, सय्यद रमजान, अबू सैयद, अजीम शेख, मोबीन बेग, अझर शेख,अब्बू सोफियान, अतिक शेख, रमजान सय्यद, अल्ताफ खान इत्यादी चालक व मालक याप्रसंगी उपस्थित होते.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

राज्य लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी - आयुक्त डॉ. किरण जाधव



बीड, (भगवंत पाळवदे) : नागरिकांना पारदर्शकपणे व दिलेल्या विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी तसेच त्यांच्या हक्काची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने हा राज्य लोकसेवा हक्क कायदा लागू करण्यात आला आहे. नागरिकांना सर्व सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन द्याव्यात. या कायद्याच्या माध्यमातून प्रशासनाने नागरिकांच्या दारात पोहोचून विहित कालमर्यादेत शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा मिळविण्यासोबतच, शासनाची प्रतिमा उंचाविण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. असे आवाहन राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्य लोकसेवा हक्क कायदा अंमलबजावणीबाबतच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ.किरण जाधव बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरिश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.


डॉ.किरण जाधव म्हणाले की, आपले ब्रिदवाक्य जनतेची सेवा हेच आमचे कर्तव्य असले पाहिजे आणि याच भावनेतून महाराष्ट्रातील जनतेला अर्ज केल्यास त्यांना डिजीटल प्रमाणपत्रही तात्काळ मिळायला हवे याच दिशेने प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोनातून वाटचाल करायला हवी. नागरिक कार्यालयात आल्यानंतर त्यांना कार्यालय स्वच्छ दिसून त्यांचे मन प्रसन्न व्हावे अशी आसन व्यवस्था तातडीने कार्यालयाने करावी. आपले सरकार केंद्राद्वारे विहीत कालमर्यादेत सेवा पुरविण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजे. जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्रावर तक्रार पेटी ठेवण्यात यावी. आपले सरकार केंद्रामधुन विविध सेवांसाठी अर्ज आणि अपील दोन्ही करता येतात. हा कायदा नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त असून, या कायद्याची माहिती जनतेला व्हावी यासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात या कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सेवांची व त्यासाठीच्या कालमर्यादेची माहिती डकविणे बंधनकारक आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतिमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. विहित कालमर्यादेत काम न करणाऱ्या अधिकाऱ्यासाठी दंडाची तरतूद या अधिनियमात करण्यात आली असल्याचे ही डॉ.किरण जाधव यांनी यावेळी सांगितले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 अंतर्गत कायद्याची सविस्तर माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली. जिल्ह्यातील प्राप्त अर्ज व प्रलंबित अर्ज, विभागनिहाय व तालुकानिहाय कामगिरी, प्रचार व प्रसार सूचना फलक, अपील अहवाल, अधिसूचित सेवाची विभागनिहाय संख्या, वेळेत निकाली प्रकरणे, ग्रामपंचायत सेवा केंद्रे, आपले सरकार सेवा केंद्रासाठी जाहिरात व अर्जस्थिती, सक्रीय व शुन्य व्यवहार आपले सरकार सेवा केंद्र, आदर्श आपले सरकार सेवा केंद्रे आदिच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावाही आयुक्त डॉ.जाधव यांनी यावेळी घेतला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून जिल्ह्यात जास्तीत-जास्त सेवांचा लाभ देण्यासाठी सध्या अधिसूचित असलेल्या सेवांची बीड जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सर्वांनी मुदतीत सेवा द्यावी. तसेच हा कायदा जास्तीत-जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी वेळेत कार्यवाही करावी. असेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठकीत निर्देश दिले. यावेळी बैठकीस संबंधित यंत्रणेचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

जंगल जमीन वाचवा, हजारो ग्रामस्थांनी एकत्र येत उभारली मानवी साखळी



कन्नड (अरुण थोरात) : अजिंठा डोंगरात होणाऱ्या जल विद्युत प्रकल्पा करिता ३ लाख झाडे व १२३५ एकर वन व शेत जमीन वाचविण्यासाठी वडोद येथे महाराष्ट्र धावून आल्याचे चित्र बघायला मिळाले आहे. सह्याद्री पर्वत रांगेतील भीमाशंकर येथील वृक्षतोड व टोरंटो प्रकल्पामुळे राज्यात निसर्ग प्रेमींमध्ये खदखद निर्माण झाली आहे. याच सह्याद्रीची उपरांग असलेल्या सातमाळ अजिंडा डोंगर रांगेतील अजिंठा डोंगरात प्रस्तावित असलेल्या ग्रीन -को एनर्जी, या जलविद्युत म्हणजे हायड्रो थर्मल पॉवर प्रोजेक्ट या पंप स्टोरेज पंप प्रकल्पासाठी डोंगराच्या खालील बाजूची सोयगाव वनक्षेत्र विभागाच्या अभिप्राया नुसार त्यांच्या अखात्यातील सुमारे १ लाख ७३ हजार व वरच्या पट्ट्यातील वडोद विठ्ठलाचे या गावाला लागून असलेल्या रक्ताई डोंगराच्या आजबाजूची सव्वा लाखाच्या आसपास झाडे अशी अंदाजे ३ लाख वृक्षांची कत्तल केली जाईल असा वन विभागाचा अंदाज आहे. सुमारे १० हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा व २ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मितीचा हा प्रकल्प कन्नड व सोयगाव तालुक्याच्या सीमेवर प्रस्तावित असून सोयगाव व कन्नड तालुक्यातील प्रादेशिक वन विभागाची सातशे पन्नास एकर वन जमीन यात बाधित होणार आहे. तर ५०० एकर शेत जमीन यात अधिग्रहित होणार आहे. येथील बरेच शेतकरी हे आदिवासी भिल्ल समाजाचे आहेत. वडोद विठ्ठलाचे येथील पूर्ण गाव या प्रकल्पाच्या विरोधात आहे. तर वाडी, नायगाव, निमचौकी येथील शेतकरी व निसर्ग प्रेमी नागरिक ही हा प्रकल्प होऊ नये म्हणून विरोधात आहे. कारण या ठिकाणी प्रचंड वृक्ष तोड होणार असल्याने परिणामी स्थानिक जैवविविधता नाश होऊन पर्जन्यमान कमी होणे, वन्यजीव व मानवी संघर्ष निर्माण होणे, पाण्या वरचा हक्क गमावणे, डोंगरात ब्लास्टिंग केल्याने डोंगर, दरड कोसळणे, जल प्रदूषण , आदी समस्या कायम स्वरुपी निर्माण होतील. या चार गावांनी कोणत्याही राजकीय पक्षाची मदत न घेता, कोणाचाही विरोध न करता आदिवासी जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्ताने शांततामय मार्गाने गावाजवळ एकत्र येत. भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन करून वन दिंडी काढली. टाळ मृदुंगाच्या गजरात जेथे जंगल बाधित होणार आहे. तिथे ही वनदिंडी पोहचली. जंगला भोवती एकमेकांच्या हातात हात घालून विक्रमी मानवी साखळी उभारून निसर्ग वाचवण्यासाठी शासनाला संदेश देत साकडं घातले. झाडे ही प्राणाहून प्रिय असल्याचे दर्शवित एक हजार निसर्ग प्रेमींनी हातात हात घेऊन एक किलोमीटर परिघाची मानवी साखळी उभारली होती. जी ग्रामीण महाराष्ट्रातील सर्वात मोठी मानवी साखळी समजली गेली, असे अजिंठा वन संरक्षण समितीच्या वतीने डॉ.संतोष पाटील यांनी स्पष्ट केले. झाडांना मिठी मारून भविष्यात गरज पडल्यास चिपको आंदोलनासाठी गावाने एकत्र येण्याची तयारी दर्शवली आहे. जिल्ह्यातील व जिल्ह्या बाहेरील असंख्य पर्यावरण प्रेमींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी लहान मुलांनी विविध वन्यजीवांचे मुखवटे घालुन जल जंगल जमीन वन्यजीव संपदा वाचविण्याची मागणी केली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

रामकृष्ण हरी

हातामध्ये टाळ । मुखी पांडुरंग ।
वाजते मृदंग । भजनात ।।१।।

टाळ मृदुंगाचा । रंगत रंगले ।
भजनी दंगले । वारकरी ।।२।।

रामकृष्ण हरी । मंत्र आहे भारी ।
संकटात तारी । भक्तजना ।।३।।

वारकरी सारे । भेटण्यास आले ।
धन्य धन्य झाले । दर्शनाने ।।४।।

पायी चालतांना । नामजप चाले ।
वाचा सदा बोले । पांडुरंग ।।५।।

आनंदी आनंद । वारीत दिसते ।
वीणा ही हसते । वाजतांना ।।६।।

नागेश गातोय । विठ्ठलाची गाणी ।
शुद्ध असो वाणी । प्रत्येकाची ।।७।।

नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

हल्ली शहराला झोप येत नाही..

हल्ली
गावाच्या अनामिक ओढीने
हुरहुर दाटलीय काळजात.. शहराच्या

आताशा झोप येत नाही त्याला
गावाकडच्या आठवणी
काळजाला भेगा पाडून
रातभर हैदोस घालत असल्यानं..

रातच्याला शहर
फिरत असतं
कामातून उसंत मिळाल्यानं
गावच्या शेतशिवारात
रानवाऱ्यासोबत
चांदण्याच्या उजेडात
सर्जा राजाला घेऊन..

शहर व्यस्त झालंय हल्ली
इतभर पोट
कासराभर लांबल्यानं..

आता
झगमगाट दिसतोय शहरात
पण आतून कोंड्वाडा झालाय
म्हणून उबगलं ते
सिमेंटच्या मायावी संस्कृतीला
अन् दिखाऊ जगण्याला..

त्याला आठवत राहतो रातभर
गप्पांचा पार
अन् पहिल्या पावसात भिजलेला
काळजातला गाव

अन्
जात्यावरच्या हरवलेल्या ओवीसोबत
अभंगाचा स्वर
आईच्या हातची
चुलीवरची बाजरीची भाकर

अन् आठवते त्याला
धुळीनं माखलेली पांदीची वाट
बालपणी पाहिलेलं
हिरवंगार शिवार

अन् यातच होते पहाट
मग धावत सुटतं शहर
कामासाठी सुसाट.. शहरभर..

ज्ञानेश्वर गायके, कन्नड

धरणातील वाया जाणारे पाणी आता थेट भूगर्भात - प्रा. डॉ. संजय रावसाहेब बिरादार यांच्या संकल्पनेला केंद्र सरकारची मान्यता

उमरगा : महाराष्ट्र म्हणजे दरवर्षी दुष्काळ, पाण्यासाठी वणवण आणि खोल-खोल जाणारी भूजल पातळी. पण याच मातीतील एका संशोधकाने, उमरग्याचे डॉ. संजय रावसाहेब बिरादार यांनी अशी संकल्पना मांडली आहे की, जी महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशाचा पाणी प्रश्न सोडवू शकते. आणि महत्त्वाचे म्हणजे या संकल्पनेला आता केंद्र सरकारच्या केंद्रीय भूजल बोर्डाने (CGWB) अधिकृत मान्यता दिली आहे.१. समस्या नेमकी काय आहे? - आपण पाणी का गमावतो?आपल्याकडे पावसाचे पाणी कमी पडते असे नाही, तर आपण ते साठवून ठेवण्यात कमी पडतो, हेच खरे दु:ख आहे.पावसाळ्यात धरण भरते. धरण भरल्यावर सांडव्यावरून पाणी वाहून जाते. हे पाणी आपल्या गावाचे असते, आपल्या शेतकऱ्याचे असते, पण ते काही तासांत नदीतून वाहून जाऊन समुद्राला मिळते.दुसरीकडे, ४ महिन्यानंतर त्याच गावात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लागतो. त्याच गावातली विहीर कोरडी पडते. त्याच गावातला बोअरवेल ५००-६०० फूट खोदूनही कोरडाच निघतो.म्हणजे एकाच गावात, एकाच वर्षात, पाणी वाहून जाणे आणि पाणी नसणे - या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतात. हा विरोधाभासच डॉ. बिरादार यांच्या संशोधनाचा पाया आहे.प्रश्न असा आहे - वाहून जाणारे पाणी जर त्याच वेळी जमिनीत मुरवले तर? जमिनीखाली एक मोठी नैसर्गिक टाकी आहे, ती म्हणजे भूजल साठा. ती टाकी जर भरली, तर उन्हाळ्यातही पाणी मिळेल.२. संकल्पना काय आहे? - अगदी सोप्या भाषेत*डॉ. बिरादार यांची कल्पना अशी आहे -जलाशय कोरडा असताना, धरणाच्या आतील बॅकवॉटर क्षेत्रात, पण धरणाची पाळू, सांडवा, पाया या संरचनात्मक भागांना हात न लावता, सुरक्षित अंतरावर, पुनर्भरण बोअरवेल खोदायच्या.नियोजनाचे दोन ठोस निकष त्यांनी दिले आहेत:अ) अंतराचा निकष: प्रत्येक १०,००० स्क्वेअर फूट क्षेत्रासाठी एक पुनर्भरण बिंदू. म्हणजे अंदाजे नाही, तर मोजमाप करून, नकाशा काढून, ठराविक अंतरावर बोअरवेल असतील. यामुळे पाणी एकाच ठिकाणी साचून जमीन खचणार नाही, तर सर्वत्र समान पद्धतीने मुरेल.ब) खोलीचा निकष: प्रत्येक बोअरवेलची संदर्भ खोली १०० ते २०० फूट. पण ही अंतिम खोली नाही. प्रत्यक्षात त्या ठिकाणचा भूगर्भ कसा आहे, जलधारक स्तर (Aquifer) किती खोल आहे, माती, खडक कसा आहे, याचा भूगर्भीय सर्वेक्षण करूनच अंतिम खोली ठरवायची. म्हणजे अंधाधुंद खोदकाम नाही, तर शास्त्रीय पद्धत आहे.आणि सर्वात महत्त्वाचे - या बोअरवेलची पाणी प्रवेश व्यवस्था सांडव्याच्या पातळीशी समन्वयित करायची.याचा अर्थ काय? सांडव्याची उंची बदलायची नाही, सांडवा फोडायचा नाही, धरणाला छिद्र पाडायचे नाही. तर सांडव्यापासून स्वतंत्र, सुरक्षित, अभियंत्यांनी मंजूर केलेली एक वेगळी पाईपलाईन / प्रवेश व्यवस्था तयार करायची. जेव्हा पाणी सांडव्याच्या पातळीला येईल, म्हणजे धरण पूर्ण भरले आहे आणि आता पाणी वाहून जाणार आहे, तेव्हाच त्या अतिरिक्त पाण्याचा काही भाग, सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने, फिल्टर करून, नियंत्रित वेगाने बोअरवेलमध्ये सोडायचा.३. हे इतर पद्धतींपेक्षा वेगळे कसे?आज आपल्याकडे पाणी मुरवण्यासाठी काही पद्धती आहेत - शेततळे, बंधारे, पाझर तलाव, रूफटॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग. त्या सगळ्या चांगल्याच आहेत, पण त्यांच्या मर्यादा आहेत.शेततळ्यात पाणी साठते, पण उन्हात ते आटते. बंधाऱ्यात पाणी अडवले जाते, पण गाळ साचतो. पाझर तलावातून पाणी हळूहळू मुरते, पण त्याला खूप वेळ लागतो.डॉ. बिरादार यांची पद्धत यापेक्षा वेगळी आहे कारण -- ती थेट आहे. पाणी वरून खाली मुरण्याची वाट बघत नाही, तर थेट १००-२०० फूट खोल, जलधारक स्तरापर्यंत पोहोचवले जाते.- ती नियंत्रित आहे. किती पाणी सोडायचे, किती वेगाने सोडायचे, हे आपल्या हातात आहे. पाणी जास्त झाले तर बंद करता येते.- ती फिल्टर केलेली आहे. गाळ, कचरा थेट भूगर्भात जाणार नाही. आधी गाळणी होईल, मगच पाणी आत जाईल. त्यामुळे भूजल प्रदूषित होण्याचा धोका नाही.- ती धरणाच्या आत आहे. त्यामुळे नवीन जमीन लागत नाही, शेतकऱ्याचे नुकसान नाही, विस्थापन नाही.४. धरणाच्या सुरक्षिततेचा प्रश्न - सर्वात मोठी शंका आणि उत्तरअनेकांना वाटेल - धरणात बोअरवेल खोदल्याने धरणाला धोका होईल का? हा प्रश्न अगदी रास्त आहे. आणि डॉ. बिरादार यांनी त्याचे उत्तर आधीच त्यांच्या प्रस्तावात दिले आहे.१. धरणाची पाळू, सांडवा, पाया, अस्तर यांना अजिबात हात लावायचा नाही. त्यांच्यापासून सुरक्षित अंतर सोडूनच काम करायचे.२. सांडव्याच्या मूळ संरचनेत कोणताही बदल करायचा नाही.३. काम सुरू करण्यापूर्वी भूगर्भीय, भूभौतिकीय सर्वेक्षण, धरण सुरक्षा तज्ज्ञांचे मत आणि जलसंपदा विभागाची मंजुरी आवश्यक आहे.४. प्रत्येक बोअरवेलला केसिंग पाईप, सीलिंग आणि स्क्रीन असणार आहे, जेणेकरून पाणी इकडे-तिकडे पाझरणार नाही, तर फक्त ठराविक जलधारक स्तरातच जाईल.म्हणजे ही कल्पना धरणाला धोका निर्माण करणारी नाही, तर धरणाच्या पाण्याचा अधिक चांगला उपयोग करणारी आहे.५. दोन टप्प्यातील कार्यपद्धती - नेमके काय होणार?टप्पा अ - जलाशय कोरडा असताना:यावेळी बॅकवॉटर क्षेत्र मोकळे असते. तेव्हा मोजमाप, नकाशांकन, सांडव्याची अधिकृत पातळी नोंदवणे, सुरक्षित अंतर ठरवणे, भूगर्भ सर्वेक्षण करणे, १०,००० स्क्वेअर फूट प्रमाणे ठिकाणे निश्चित करणे, बोअरवेल खोदणे, केसिंग, फिल्टर पॅक बसवणे, नियंत्रण व्यवस्था तयार करणे - ही सगळी कामे होतील.टप्पा ब - जलाशयात पाणी आल्यावर:यावेळी पाणीपातळी रोज मोजली जाईल. पाणी सांडव्याच्या पातळीपर्यंत पोहोचले का, हे पाहिले जाईल. धरणातील पिण्याचे पाणी, सिंचनाचा साठा, पर्यावरणीय प्रवाह याला धक्का न लावता, फक्त अतिरिक्त पाण्याचा विचार केला जाईल. मग सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने ते पाणी फिल्टर करून बोअरवेलमध्ये सोडले जाईल. किती पाणी गेले, भूजल किती वाढले, पाण्याची गुणवत्ता काय आहे, याची दररोज नोंद ठेवली जाईल.६. केंद्र सरकारने काय म्हटले? - हीच खरी मान्यताडॉ. बिरादार यांनी ही संकल्पना माननीय पंतप्रधानांकडे तक्रार क्र. PMOPG/E/2026/0212057 द्वारे सादर केली होती.त्यावर केंद्रीय भूजल बोर्ड, मध्य क्षेत्र, नागपूर यांनी दि. 13.11.2026 रोजी पत्र क्र. CGWB(CR)/Grievance-2026/4508 द्वारे कळवले आहे की,> "आपली चिंता आणि प्रयत्न चांगल्या प्रकारे समजून घेतले असून त्यांचे कौतुक करण्यात आले आहे. राज्याच्या जलसंपदा विभाग आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांना विनंती करण्यात येईल की, हायड्रोजिओलॉजिकल योग्यतेचा विचार करून प्रायोगिक तत्त्वावर (Pilot Basis) या संकल्पनेचा वैज्ञानिक अभ्यास करावा. पायलट अभ्यासादरम्यान CGWB सर्व तांत्रिक मदत देईल."याचा अर्थ असा नाही की उद्यापासून सगळ्या धरणात हे काम सुरू होईल. याचा अर्थ असा आहे की, केंद्राने ही कल्पना गांभीर्याने घेतली आहे आणि राज्याला सांगितले आहे - आधी एका ठिकाणी करून बघा, यशस्वी झाले तर पुढे न्या. विज्ञानात यालाच पायलट स्टडी म्हणतात.७. महाराष्ट्रासाठी, मराठवाड्यासाठी का महत्त्वाचे?महाराष्ट्रातील भूजल पातळी गेल्या 10 वर्षांत सरासरी 3 ते 5 मीटरने खाली गेली आहे. छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर, बीड, सोलापूर या जिल्ह्यातील अनेक गावांत 500-600 फूट खोल बोअरवेललाही पाणी लागत नाही.याचे परिणाम काय आहेत?- शेतकऱ्याला दरवर्षी नवीन बोअरवेल खोदावा लागतो, 1-2 लाख रुपये खर्च होतो.- पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल चालावे लागते.- तरुण शेती सोडून शहराकडे जातात.- जनावरांना पाणी मिळत नाही.जर धाराशिव किंवा लातूर जिल्ह्यातील दोन ते तीन तलावांमध्ये हा प्रयोग यशस्वी झाला, तर तो संपूर्ण मराठवाड्यासाठी मॉडेल ठरेल. एका तलावातून आजूबाजूच्या 10-15 गावांना फायदा होऊ शकतो.८. पुढील पाऊल काय? - आता काय होणे गरजेचे आहे?या पत्राच्या आधारावर डॉ. बिरादार हे जिल्हाधिकारी, धाराशिव व लातूर यांच्याकडे फॉलो-अप पत्र देणार आहेत. त्यात त्यांच्या ४ स्पष्ट मागण्या आहेत:१. जिल्ह्यातील 1-2 तलावांवर पायलट प्रोजेक्ट सुरू करावा.२. CGWB, GSDA आणि जलसंपदा विभागाची तांत्रिक समिती स्थापन करावी.३. संयुक्त साईट पाहणी करावी.४. प्रयोगासाठी परवानगी द्यावी.ते पूर्ण तांत्रिक आराखडा देण्यास तयार आहेत. त्यांचा हेतू व्यवसाय नाही, तर समाजसेवा आहे.९. शेतकऱ्यांची प्रतिक्रिया आणि जनतेची अपेक्षा"दरवर्षी धरण भरून वाहून जाते आणि आमच्या विहिरी कोरड्या राहतात. साहेबांची कल्पना जर झाली तर आमचे पाणी आमच्याच जमिनीत मुरेल," अशी भावना स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात आहे. केंद्राने हिरवा कंदील दाखवला आहे. आता राज्याने आणि जिल्ह्याने पुढाकार घेतला, तर येत्या पावसाळ्यातच पहिला प्रयोग होऊ शकतो. आणि जर तो यशस्वी झाला, तर मराठवाड्याचा लेक देशाला पाणी प्रश्नावर नवा मार्ग दाखवेल, यात शंका नाही.



डॉ. संजय रावसाहेब बिरादार,
उमरगा जि. धाराशिव, महाराष्ट्र
मो. 9421354696

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

भरती प्रक्रियेत कन्स्ट्रक्शन सुपरवायझर व आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समनधारकांचा समावेश करण्याची मागणी - भगवंत पाळवदे



बीड : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या १३४ जागांसाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, या भरती प्रक्रियेत कन्स्ट्रक्शन सुपरवायझर आणि आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन हे अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना पात्रतेत वगळण्यात आल्याने बेरोजगार तरुणांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांच्या पात्रतेमध्ये समावेश करून तातडीने शुद्धिपत्रक काढावे, अशी मागणी वंदेमातरम कौशल्य विकास संस्था, अंबाजोगाईचे संस्थापक सचिव श्री.भगवंत पाळवदे यांनी मागणी केली आहे.भरतीच्या जाहिरातीत पात्रतेसाठी केवळ सिव्हिल इंजिनिअरिंगमधील डिप्लोमा, पदवी किंवा शासनमान्य समकक्ष पदवीचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे कन्स्ट्रक्शन सुपरवायझर आणि आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन हे अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवार या भरतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे, २०२३ मधील भरती जाहिरातीमध्ये आयटीआय आणि कौशल्य विकास केंद्रांतर्गत शिकविल्या जाणाऱ्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अभ्यासक्रमासोबत आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन आणि कन्स्ट्रक्शन सुपरवायझर या अभ्यासक्रमांचाही समावेश होता. तसेच ११ मार्च २००८ च्या शासन निर्णयानुसार या अभ्यासक्रमांच्या समकक्षतेचा आधार घेण्याची मागणीही सचिव भगवंत पाळवदे यांनी केली आहे.२०२६ च्या भरती प्रक्रियेत दोन्ही अभ्यासक्रमांच्या उमेदवारांना पात्र ठरविण्यासाठी संबंधित शासन निर्णयातील समकक्षतेची पडताळणी करावी आणि पात्रतेबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा. तोपर्यंत उमेदवारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी प्रशासकीय उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या भरतीसाठी अर्ज प्रक्रिया १३ नोव्हेंबरपासून सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत २७ नोव्हेंबर आहे. परीक्षा २४ जानेवारी २०२७ रोजी होणार असल्याने प्रशासनाने वेळेत निर्णय घेऊन शुद्धिपत्रक प्रसिद्ध करावे, अशी अपेक्षा उमेदवार व्यक्त करीत आहेत.दोन्ही अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी राज्यात भरपूर आहेत. ते सर्व विद्यार्थी या पदापासून आणि परीक्षेपासून वंचित राहत असल्याने एकप्रकारे त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा आणि नोकरी करता पात्र होण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शुद्धिपत्रक काढून दोन्ही अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा. नसता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विरोधात न्यायालयात दाद मागितली जाईल, असे वंदेमातरम कौशल्य विकास संस्था, अंबाजोगाईचे संस्थापक सचिव श्री.भगवंत पाळवदे यांनी म्हटले आहे

स्वाभिमानी आंदोलक आक्रमक, थेट कारखाना गव्हाणीवर मांडला ठिय्या



कन्नड (अरुण थोरात) : पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांप्रमाणे कन्नड येथील बारामती एग्रो युनिट- २ या साखर कारखान्याने ऊसास प्रतीटन ४२०० रुपये प्रमाणे भाव जाहीर करण्याच्या मागणीसाठी आक्रमक झालेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कारखान्याचे गेट उघडून थेट ऊस गव्हाणीतच ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.याबाबत दि. १७ आक्टोंबर रोजी कन्नड जवळील पानपोई फाटा येथे स्वाभिमानी शेतकरी संघटना व ऊस उत्पादक शेतकर्यांनी ऊस दरवाढ मागणीसाठी ऊस वाहतूक रोको आंदोलन केले होते. त्यावेळी कारखाना व्यवस्थापनाने दि. २५ आक्टोंबर पर्यंत नवीन दर जाहीर करु असे लेखी आश्वासन दिल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. मात्र मुदत उलटून ही ऊस गाळप सुरु करत ऊस दर जाहीर केला नाही. त्यामुळे शेतकर्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. अखेर दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी स्वाभिमानी शेतकरी संघटना व ऊस उत्पादकांनी ऊस दर जाहीर करण्याच्या मागणी साठी कारखाना गेट समोर आंदोलन करीत प्रशासनाने चर्चेसाठी येण्याचे अवाहन केले. मात्र प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने आंदोलक व शेतकरी आक्रमक होत कारखान्याचे गेट उघडीत सुरक्षा रक्षकांचा विरोध झुगारत थेट ऊसाच्या गव्हाणीत ठिय्या मांडला. या सबंध गदारोळात कारखाना प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जो पर्यंत कारखाना प्रशासन ऊसास पहीली उचल ३९०० जाहीर करीत नाही. तो पर्यंत आंदोलन सुरुच राहणार असल्याचे आंदोलकांनी सांगीतले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

स.भु. प्रशालेची सहल - पुस्तकांच्या गावात



छत्रपती संभाजीनगर : येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेतील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीनिमित्त महाबळेश्वर जवळील भिलार या पुस्तकांच्या गावास भेट दिली. विद्यार्थ्यांनी भिलार गावातील जवळपास ३० ठिकाणांना भेट दिली. तेथील पुस्तके वाचण्याचा आनंद घेतला. विद्यार्थी वाचनात दंग होऊन गेले. वाचन संस्कृतीचे महत्त्व प्रकल्प कार्यालयातील श्री. राजेश जाधव यांनी विषद केले. यावेळी विद्यार्थ्यांना लघुपट दाखविण्यात आला. या अनोख्या गावात विद्यार्थी दंग होऊन गेले. कथा, कादंबरी, स्त्री साहित्य, शिवकालीन गडकिल्ले, विज्ञान, बालसाहित्य असे कितीतरी साहित्यप्रकारांची पुस्तके विद्यार्थ्यांनी हाताळली.

प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांच्या मार्गदर्शनाने व विजय पिंपळे, विजय पाताळयंत्री, संदीप घुगे, सीमा मुंदडा, दिपाली सोळंके, राजेश राठोड, संध्या चोले, अभिजीत जाधव यांच्या सहकार्याने शैक्षणिक सहलीतील भिलार गावाला भेट यशस्वी झाली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १८ नोव्हेंबर २०२६

ॲड. राजीव देशमुख यांची बीड जिल्हा परिषद पॅनलवर निवड



बीड : जिल्हा तालुका केज मधील वरपगावचे प्रसिद्ध डॉक्टर तात्यासाहेब रंगनाथराव देशमुख यांचे चिरंजीव एडवोकेट राजीव देशमुख यांची बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनलवर नियुक्ती झाली आहे. बीड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषदेची बाजू औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात मांडण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. एडवोकेट राजीव देशमुख हे गेली ३० वर्षापासून औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात एक निष्णात वकील म्हणून काम करत आहेत. ते सध्या जिल्हा परिषद संभाजीनगर, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ व म्हाडा चे वकील म्हणूनही औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात काम पाहत आहेत. तसेच यापूर्वी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, आरोग्य विद्यापीठ ,नाशिक आणि जिल्हा परिषद, हिंगोलीच्या वतीने वकील म्हणून प्रत्येकी तीन वर्ष उच्च न्यायालय खंडपीठात चांगले काम पाहिले आहे. त्याचाच परिपाक म्हणून त्यांची बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनलवर नियुक्ती झालेली आहे. त्यांच्या नियुक्ती बद्दल त्यांचे वरपगाव ग्रामस्थांच्या वतीने हार्दिक अभिनंदन. विधी व न्याय क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहेच तो आणखी वृद्धिंगत व्हावा हीच या निमित्त सर्वांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या या नियुक्तीमुळे वरपगावच्या नावलौकिकात भर पडली असून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

१२ दिवस उलटले ४५ तलाठ्यांचे पंचनामे नाही



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : तालुक्यातील तलाठी मुख्यालयी राहत नसल्याचा मुद्दा आता पुन्हा तापला आहे. मंडळ अधिकारी, जिंतूर यांनीच दि. ०६/१०/२०२६ रोजी दिलेल्या अहवालात तालुक्यातील ४८ पैकी ४५ तलाठी मुख्यालयी नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर ही व या बाबत वर्तमाणपत्र सोशल मीडिया वर बातम्या प्रसिद्ध होऊनही कार्यवाही न झाल्याने आज भाजप परभणी जिल्हा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप सोपानराव कोकडवार यांनी तहसीलदार, जिंतूर यांनाप्रत्यक्ष भेटून निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.निवेदनात म्हटले आहे की, जिंतूर, बोरी, कुंभारी वगळता उर्वरित ४५ तलाठी हे आपल्या सज्जात न राहता जिंतूर तहसील कार्यालयाच्या पाठीमागे व शहरात इतर ठिकाणी कार्यालय थाटून कारभार चालूच आहे. हा अहवाल तहसील कार्यालयातीलच मंडळ अधिकाऱ्याने दिला असल्याने यावर शंका उरलेली नाही.यामुळे गावातील शेतकऱ्यांना ७/१२, फेरफार, वारस नोंद यासारख्या साध्या कामांसाठी जिंतूरला हेलपाटे मारावे लागत आहेत. वेळ आणि पैसा वाया जात आहे. दुष्काळी परिस्थिती असतानाही अधिकारी गांभीर्याने घेत नाही कोकडवार यांनी मागणी केली की -१. सर्व ४५ तलाठ्यांच्या सज्जात / मुख्यालयी जाऊन तात्काळ पंचनामे करावेत.२. सज्जा चे कार्यालय बंद, तलाठी हजर नाही, याची पंचनाम्यात स्पष्ट नोंद करावी.३. दोषी तलाठ्यांवर निलंबन व विभागीय चौकशीची कारवाई करून अहवाल उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना पाठवावा.७ दिवसांत कार्यवाही करून त्याची लेखी प्रत द्यावी, अन्यथा वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार करणार असल्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.या वर तहसीलदार काय करतात या कडे लक्ष लागले आहे निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, महसूल मंत्री व जिल्हाधिकारी, उपविभाग अधिकारी सेलू यांना पाठवण्यात आल्या आहेत.

जिंतूर न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संप सुरू



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि 'समान काम समान वेतन' या प्रमुख मागणीच्या पूर्ततेसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आज, दि. 17नोव्हेंबर 2026 पासून संपाचे हत्यार उपसले आहे. अनेक दिवसांपासून विविध आंदोलनांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करूनही मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांनी अखेर संप सुरू केला आहे.न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी यापूर्वी दि. 16 सप्टेंबर 2026 रोजी आंदोलनाचा पहिला टप्पा पार पाडला होता. त्यानंतर दि. 16 ऑक्टोबर 2026 रोजी काळ्या फिती लावून कामकाज करत आंदोलनाचा दुसरा टप्पा राबविण्यात आला. मात्र, शासनाकडून अपेक्षित सकारात्मक निर्णय न झाल्याने आता दि. 17 नोव्हेंबरपासून संप सुरू करण्यात आला आहे.न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण असून, त्यांच्या कामाचे स्वरूप, जबाबदाऱ्या आणि सेवाविषयक प्रश्नांचा विचार करून प्रलंबित मागण्यांची पूर्तता करावी, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे.समान काम समान वेतन, न्याय्य सेवा अटी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी आंदोलनकर्त्यांची भूमिका आहे.या संपामुळे न्यायालयीन कार्यालयीन कामकाज, प्रकरणांची प्रशासकीय प्रक्रिया तसेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित विविध सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शासनाने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन सकारात्मक तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे न्यायालयीन कर्मचारी श्री आर एच सूर्यवंशी सहाय्यक अधिक्षक, एस जी कडतू सहाय्यक अधिक्षक, ज आ जोशी लघुलेखक, एस बी सरडे वरिष्ट लिपीक, डी पी संघई मुख्य बेलीफ, बी डी खरबे, शेख गौस शेख उमर, एस पी कराळे, व्हि पी बनतात, इतर जिंतूर न्यायालयातील कर्मचारी या संपामध्ये सहभागी आहेत

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

१.	पूर्ण पान (मल्टीकलर)	१००००/-
२.	अर्धे पान (मल्टीकलर)	५०००/-
३.	पाव पान (मल्टीकलर)	३०००/-
४.	शुभेच्छा जाहिरात	१०००/-